**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022**
**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा. क्र. वनार्टी/आस्था/परिपत्रक/643/2026-27 दिनांक :-16/07/2026

# -: परिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त (स्थापत्य अभियांत्रिकी सेवा) पूर्व परीक्षा - 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य योजनेकरीता पात्र व अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त (स्थापत्य अभियांत्रिकी सेवा) पूर्व परीक्षा 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना वनार्टी संस्थेव्दारे अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविले असता, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त (स्थापत्य अभियांत्रिकी सेवा) पूर्व परीक्षा - 2026 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य योजने अंतर्गत दि. 15/07/2026 रोजी पर्यंत **एकूण** - 39 अर्ज वनार्टीच्या संकेतस्थळावर प्राप्त झालेले होते.

त्यानुसार MPSC ने जाहिर केलेल्या निकालानुसार व वनार्टी कार्यालयाच्या अटी व शर्तीनुसार प्राप्त अर्जांची छाननी केली असता, **प्राप्त एकूण** - 39 अर्जांपैकी **एकूण** - 16 विद्यार्थ्यांचे अर्ज सदर योजनेकरीता पात्र ठरलेले आहेत, तसेच **एकूण** - 23 विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आढळुन आलेली आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्याकरीता दि. 24/07/2026 रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे. त्यानुसार पात्र व अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी वनार्टी संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**स्वा.**
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर